खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२१ – २२

### क्रीडा विभाग : वैष्णव ठाकूर याचा गौरव

लोकमत



वैष्णव ठाकूर याचे अभिनंदन करताना संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, नानासाहेब टाकळकर

## वेटलिफ्टिंग स्पर्धेत वैष्णव ठाकूरला रौप्यपदक

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** चंदीगड विद्यापीठ, मोहाली येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचा विद्यार्थी वैष्णव ठाकूर याने ९६ किलो वजनी गटात रौप्यपदकाची कमाई केली. या यशाबद्दल खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांच्या हस्ते त्याचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी संचालक सतीश नाईकरे, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय शिंदे, उपप्राचार्य प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, ग्रंथपाल प्रा. पी. व्ही. तापकीर उपस्थित होते.

या यशामुळे वैष्णव ठाकूर याची एप्रिलमध्ये विद्यापीठांतर्गत होणाऱ्या खेलो इंडिया खेलो स्पर्धेकरिता निवड निश्चित झाली आहे. या यशवंत खेळाडूला क्रीडाशिक्षक प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. तानाजी पिंगळे, प्रा. सारिका गोरे, प्रा. योगेश मोहिते यांनी मार्गदर्शन केले. राहुल गायकवाड यांनी सहकार्य केले.

प्रतिमा लोणारी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. तानाजी पिंगळे यांनी आभार मानले.

Hello Pune Gramin
Page No. 3 Mar 17, 2022
Powered by: erelego.com

नवराष्ट्र

## नानासाहेब टाकळकर यांच्या हस्ते सन्मान

# आंतरविद्यापीठीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत वैष्णव ठाकूरला रौप्यपदक



**राजगुरुनगर,** (वा.) चंदीगड विद्यापीठ मोहाली येथे ८ ते १२ मार्च २०२२ रोजी आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचा विद्यार्थी वैष्णव ठाकूर याने ९६ किलो वजनी गटात रौप्यपदकाची कमाई केली. या यशाबद्दल त्याचा सन्मान खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी संचालक सतीश नाईकरे, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय शिंदे, उपप्राचार्य प्रा.एस.एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, ग्रंथपाल प्रा. पी. व्ही. तापकीर उपस्थित होते. या यशामुळे वैष्णव ठाकूर याची एप्रिलमध्ये विद्यापीठ अंतर्गत होणाऱ्या खेलो इंडिया खेलो स्पर्धेकरीता निवड निश्चित झाली आहे. या यशवंत खेळाडूंला क्रीडाशिक्षक प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. तानाजी पिंगळे, प्रा. सारिका गोरे, प्रा. योगेश मोहिते यांनी मार्गदर्शन केले. राहुल गायकवाड यांनी सहकार्य केले. आभार प्रा. तानाजी पिंगळे यांनी मानले.

Pune Edition
19 March 2022 Page No. 2
epaper.navarashtra.com

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

# राजगुरू महाविद्यालयातील वैष्णव ठाकूरला आंतरविद्यापीठीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत रौप्यपदक

**राजगुरुनगर (दै. संध्या) :**

चंदीगड विद्यापीठ, मोहाली आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचा विद्यार्थी वैष्णव ठाकूर याने ९६ किलो वजनी गटात रौप्यपदकाची कमाई केली.

या यशाबद्दल त्याचा सन्मान खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी संचालक सतीश नाईकरे, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय शिंदे उपप्राचार्य प्रा.एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, ग्रंथपाल प्रा. पी.व्ही. तापकीर उपस्थित होते. या यशामुळे वैष्णव ठाकूर याची एप्रिलमध्ये विद्यापीठ अंतर्गत होणाऱ्या खेलो इंडिया खेलो स्पर्धे करीता निवड निश्चित झाली आहे.

संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील यांनी वैष्णव ठाकूर याचे अभिनंदन करताना त्याच्या पुढील वाटचालीस संस्थेच्या वतीने सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

यशापयशाची चिंता न करता सर्वोत्तम क्षमतेने खेळ करण्याचे त्याला आवाहन केले.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**